**<u>दि.१९/१०/२०२२ रोजी फिर्यादीतर्फे साक्षीदार, विधिज्ञ, आरोपी व तर्फे विधिज्ञ हजर.</u>**
**<u>शपथेवर उलटतपास सुरु–</u>**
**<u>आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एम. बी. पाटील याचेतर्फे–</u>**

१२. सारा एजन्सी ही प्रोप्रायटरशिप कंपनी आहे. ही प्रोप्रायटरशिप सन २०१३ मध्ये नोंदणीकृत केलेली आहे. ही प्रोप्रायटरशिप प्रत्येक वर्षी नोंदणीकृत करावी लागते याची मला माहिती नाही. सन २०१८–२०१९ मध्ये सारा एजन्सी नोंदणीकृत होती. सारा एजन्सी नोंदणीकृत करीत असताना त्याच्या मालमत्ता व जबाबदाऱ्या म्हणजेच असेटस् व लॅबटीज् बाबत माहिती दिलेली नाही. सचिन गावडे माझे मित्र आहेत. सारा एजन्सी मध्ये सचिन गावडे यांचा सहभाग नाही. तसेच ते या एजन्सी मध्ये अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून काम देखील करीत नाहीत. सारा एजन्सी चे व्हाऊचर बुक छापलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सारा एजन्सीच्या व्हाऊचर बुकवर सचिन गावडे यांचे नांव छापलेले आहे. सारा एजन्सीच्या व्हाऊचरवर सचिन गावडे यांचे नांव छापण्याचा काहीही हेतू नाही. सारा एजन्सीचे हाऊचर बुक १०० पानांचे आहे. सारा एजन्सी करीता मी आयकर विवरणपत्र भरतो. आयकर विवरणपत्र भरत असताना मी सारा एजन्सीकडील व्हाऊचर बुक ऑडीटर यांच्याकडे देतो. सन २०१८–२०१९ मध्ये मी सारा एजन्सीचे आयकर विवरणपत्र भरलेले नव्हते. सन २०१८–२०१९ मध्ये सारा एजन्सीची उलाढाल काहीही नव्हती. सारा एजन्सीमार्फत जेसीबी खरेदी केलेला नाही. सारा एजन्सी जेसीबी करीता कार्यरत होती याबद्दलचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. सारा एजन्सीचा नोंदणीकृत पत्ता सी–३०४, उपरल जिमखाना सावंतवाडी असा दिलेला आहे आणि हे माझ्या मालकीचे घर आहे. सारा एजन्सीकरीता काम करण्यासाठी मी नोकर नेमलेले आहेत. सन २०१८–२०१९ मध्ये मी सारा एजन्सी करीता एकुण १० लोकांची नियुक्ती केली होती. ही नियुक्ती मी दैनंदिन रोजगारावर केली होती. त्या लोकांना मी रोजगार दिलेबाबत व्हाऊचर घेत नव्हतो तर त्यांच्या बँक खातेवर रोजगार जमा करीत होतो. अजमल अली यांना मी ओळखतो. ते माझ्याकडे जेसीबी ऑपरेटर म्हणून काम करीत होते. अजमल अली माझ्याकडे डिसेंबर २०१८ ते मार्च २०१९ पर्यंत कार्यरत होते.

अजमल अली यांना दरमहा रु.१४,०००/– इतका पगार देत होतो. अजमल अली यांना पगार दिलेबाबत मी बँक स्टेटमेंट हजर करु शकतो.

१३. आरोपीला मी एप्रिल २०१७ पासून ओळखतो. आरोपीकडे बांधकामाचे कामकाज असते याबद्दल मला माहित नाही. मी आरोपीने माझ्याकडून कामासाठी जेसीबी घेतला होता म्हणून आरोपीला मी ओळखतो. आरोपीने माझ्याकडून पहिल्यांदा जेसीबी केंव्हा घेतला होता हे मला आठवत नाही. आरोपीने माझ्याकडून दोन वेळेस जेसीबी कामाकरीता घेतला होता. माझा जेसीबी आरटीओ कार्यालयामध्ये नोंदणीकृत आहे. हे म्हणणे खरे आहे की, जेसीबी व्यक्तीगत किंवा व्यावसायिक कारणाकरीता खरेदी केला असेल तर तशी आरटीओ कार्यालयाकडे व्यक्तीगत किंवा व्यावसायीक अशी नोंद असते. मी व्यावसायिक कारणाकरीता जेसीबी घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये जेसीबी हा व्यावसायिक कारणासाठी घेतला आहे अशी आरटीओ कार्यालयाकडील नोंद नाही. मी जेसीबी व्यायसायिक कारणाकरीता घेतल्याचे सांगत आहे त्याबाबत जेसीबीचा वाणिज्य कर भरलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, हा वाणिज्य कर प्रत्येक वर्षी भरावा लागतो. सन २०१८ व २०१९ मध्ये मी किती वाणिज्य कर भरला होता हे मी सांगू शकत नाही, परंतु मी त्याची पावती हजर करु शकतो. माझा जेसीबी मी डोंगर सपाटीकरण व जमीन सपाटीकरण याकरीता वापरतो. माझा जेसीबीचा व्यवसाय आज देखील अस्तित्वात आहे. हे म्हणणे खरे आहे की, डोंगर किंवा जमीन सपाटीकरणाकरीता शासनाची परवानगी घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, शासनाची परवानगी घेतल्यानंतर आणि आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर जमीन किंवा डोंगर सपाटीकरण करता येते. बेकायदेशीरपणे डोंगर किंवा जमीन सपाटीकरण केले असल्यास संबंधीत मशीन शासनाकडून जप्त केले जाते याची मला माहिती नाही. आरोपीने जेसीबी पहिल्यांदा माझ्याकडून कोणत्या कालावधीमध्ये घेतला होता हे मला आठवत नाही. त्यावेळी जेसीबी किती कालावधीकरीता घेतला होता हे मला आठवत नाही पंरतु त्याचा मेहनताना किती दिला होता हे मला आठवते. आरोपीने पहिल्यांदा जेसीबी कोणत्या मिळकतीमधील कामासाठी

घेतला होता हे मला आठवत नाही. आरोपीने पहिल्यांदा जेसीबी घेतला होता त्यावेळेस या जेसीबीवर ऑपरेटर म्हणून अजमल अली होते. माझ्या जेसीबी मशिनद्वारे किती काम केले आणि कधी काम केले याच्याबद्दल मी नोंदवही ठेवलेली नाही. ऑक्टोबर २०१८ मध्ये या जेसीबीद्वारे किती तास काम केले होते हे मला आठवत नाही. ऑक्टोबर २०१८ मध्ये या जेसीबीचा दर प्रतितास दर रु. ८५०/– इतका होता. दि.२४/१०/२०१८ पूर्वी माझ्या जेसीबी मशिनद्वारे मी कोणाचे डोंगर किंवा जमीन सपाटीकरण किंवा खोदकाम केले होते का? हे मला आठवत नाही. दि. ०३/११/२०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये माझ्या जेसीबी मशिनद्वारे कोणाचे डोंगर सपाटीकरण किंवा खोदकाम केले होते का? हे मला आठवत नाही. दि.२४/१०/२०१८ ते दि. ०२/११/२०१८ दरम्यान मी आरोपीच्या मिळकतीमध्ये गेलेलो होतो. आरोपीची ती मिळकत सपाट जमीन होती. मी आरोपीच्या मिळकतीमध्ये दि.२४/१०/२०१८ रोजी गेलो होतो आणि एक तासभर तेथे थांबलो होतो. आरोपीला जे बील दिले होते ते सारा एजन्सी करीता दिले होते.

१४. सारा एजन्सी करीता मी कायदेशीर बाबी पाहतो. सारा एजन्सी करीता सावंतवाडी न्यायालयामध्ये कलम १३८ अन्वये किंवा इतर दुसऱ्या कोणत्या केसेस दाखल केलेल्या नाहीत. ही केस मी व्यक्तीगत दाखल केलेली आहे. नि.३० वरील व्हाऊचर माझे व्यक्तीगत व्हाऊचर नसुन सारा एजन्सीचे व्हाऊचर आहेत. नि.३० वरील व्हाऊचर मी स्वतः केलेले आहेत. नि.३० वरील व्हाऊचर मध्ये जेसीबीचा वापर ७७ तास ४५ मिनिटे हा जो कालावधी नमुद केला आहे हा कालावधी मला जेसीबी ऑपरेटर यांनी त्यांच्या नोंदवहीमध्ये ठेवलेल्या नोंदीनुसार दिलेला आहे. जेसीबी ऑपरेटर यांची नोंदवही मी याकामी दाखल केलेली नाही. नि.३० वरील व्हाऊचरची कार्बनप्रत मी दाखल करु शकतो. नि.३० वरील व्हाऊचरची कार्बनप्रत आहे. मी याकामी व्हाऊचर क्र. ८४ चा पूर्वीचा व्हाऊचर क्र. ८३ ची कार्बनप्रत हजर करु शकतो. व्हाऊचर क्र. ८३ कोणाला दिला होता हे मला आज आठवत नाही. व्हाऊचर क्र.८३ मध्ये जेसीबीचा प्रतितास दर किती लिहिला होता? आणि किती तास काम लिहिले होते? हे मला आठवत नाही. व्हाऊचर क्र. ८३

देखील मी स्वतः तयार केले होते आणि त्यावर हा व्हाऊचर तयार करणार म्हणुन सही देखील केली आहे. माझ्याकडील व्हाऊचर बुकमध्ये सारा एजन्सी करीता प्रोप्रायटर म्हणून माझ्या नांवाचा उल्लेख केला आहे का? हे मला आठवत नाही. या व्हाऊचरवर मी सारा एजन्सीचे प्रोप्रायटर म्हणून सही करीत होतो आणि वैयक्तीकपणे सही करीत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी मी हा व्हाऊचर देत होतो त्या दिवशीची तारीख लिहून हा व्हाऊचर देत होतो. नि.३० वरील व्हाऊचरवर तारीख लिहिलेली आहे. ती काय तारीख लिहिली आहे हे मी सांगू शकत नाही. नि.३० वरील व्हाऊचर दाखल करीत असताना मला माझ्या वकीलांनी दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.३० वरील व्हाऊचरवर तारीख नमुद नाही. या व्हाऊचरवर आरोपीने नारायण गुणाजी सांवत असे पूर्ण नांव लिहिले आहे आणि मी ते माझ्या हस्ताक्षरात लिहीलेले आहे. आरोपीचे नांव मी मराठीमध्ये लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.३० वरील व्हाऊचरवर आरोपीचे नांव मराठीमध्ये लिहिलेले नाही. नि.३० वरील व्हाऊचर वर जी काही आकडेमोड गुणाकार आणि बेरीज केलेली आहे ती आकडेमोड इंग्रजीमध्ये आहे. ज्या व्हाऊचर बुक मधून मी नि.३० वरील व्हाऊचर आरोपीला दिलेले आहे ते व्हाऊचर बुक माझ्याकडे आहे आणि मी ते याकामी दाखल करु शकतो.

१५. सन २०१८ मध्ये आरोपी मला पहिल्यांदा कधी भेटला हे मला आठवत नाही. दि. २०/११/२०१८ रोजी मी आरोपीला भेटण्यासाठी कोठेही गेलो नव्हतो. त्या दिवशी आरोपी माझ्याकडे आलेला नव्हता. दि. २०/११/२०१८ रोजी हा धनादेश माझ्या ताब्यात आल्यानंतर दि.२७/१२/२०१८ पर्यंत मी हा धनादेश वापरण्याचा प्रयत्न केला नाही. दि.२५/११/२०१८ ते दि.२७/१२/२०१८ या कालावधीमध्ये आरोपी मला भेटला होता. आरोपी मला नेमका कधी भेटला होता हे मला आठवत नाही. दि.२७/१२/२०१८ पूर्वी १५ दिवस अगोदर मला आरोपी भेटला होता. ज्यावेळी मला आरोपी भेटला होता त्यावेळी आरोपीने मला कागद दिले किंवा मी आरोपीला कागद दिले असे काही घडले नाही. आरोपीने मला धनादेश दिला आणि मी आरोपीला व्हाऊचर दिले होते असे घडले होते. दि.२७/१२/२०१८ रोजी धनादेश वटण्याकरीता जमा

केल्यांनतर दि.२९/१२/२०१२ रोजी हा धनादेश खात्यावर अपुरा निधी म्हणून न वटता परत आल्यानंतर दि.२३/०१/२०१९ पर्यंत मी आरोपीला भेटण्याचा प्रयत्न केला होता. या कालावधीमध्ये आरोपी मला भेटला नाही. आरोपीचा दुरध्वनी क्रमांक माझ्याकडे त्यावेळी होता. धनादेश न वटता परत आल्यानंतर धनादेशाची रक्कम द्यावी अन्यथा मला कायदेशीर कार्यवाही करावी लागेल असा मॅसेज मी आरोपीला दिला होता. असा मॅसेज मी आरोपीला २० वेळा दिला होता. असा मॅसेज मी आरोपीला माझ्या मोबाईल फोनवरुन तोंडी दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईल फोनवरुन कोणाला कॉल केला जातो याबाबतचे कॉल डिटेल्स संबंधीत कंपनीकडून मिळू शकतात. ते कॉल डिटेल्स मी याकामी दाखल करु शकत नाही. दि.२९/१२/२०१८ ते दि.२३/०१/२०१९ पर्यंत मला आरोपीविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यास काहीही अडचण नव्हती. मी आरोपीला जी नोटीस दिली होती ती नोटीस आरोपीने स्वीकारलेली होती. मला पोस्ट ऑफीसमार्फत जी पोहोच मिळाली आहे त्यावर नोटीस स्वीकारणार म्हणून आरोपीची सही आहे. आता मला नि.२३ व नि.२४ वरील पोस्टाकडील पोहोच दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, या दोन्ही पोहोचवर आरोपीकरीता म्हणून सही केलेली आहे. ही सही दुसऱ्यांनी केली आहे याबद्दल मी सांगू शकत नाही. नि.२३ व नि.२४ वरील सह्या आरोपीच्या नाहीत याबद्दल मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील धनादेश मला आरोपीने माझ्या जेसीबीच्या कामाकरीता कधीही दिला नव्हता.

१६. अरुणकुमार शर्मा मला माहीत आहेत. त्यांना मी सन २०१३ पासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, अरुणकुमार शर्मा यांच्या बांधकामामध्ये मी फ्लॅट व दुकान गाळा नोंदविला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी हा दुकान गाळा सारा एजन्सी करीता नोंदविला होता. हा दुकान गाळा बुक करण्यासाठी मी अरुणकुमार शर्मा यांना रक्कम रु.१,८५,०००/- दिले होते. आरोपी व अरुणकुमार शर्मा एकत्र काम करतात याबद्दल मला माहित नाही. अरुणकुमार शर्मा यांच्याकडे मी जो दुकान गाळा बुक केला होता त्याबद्दल त्यांनी मला हा दुकानगाळा दिला नाही. अरुणकुमार

शर्मा यांना मी दुकान गाळ्याकरीता दिलेली आगाऊ रक्कम त्यांनी मला परत दिली नाही. अरुणकुमार शर्मा यांनी मी त्यांना दिलेली खरेदीपूर्व रक्कम त्यांनी मला परत दिली नाही म्हणून मी त्यांना कायदेशीर नोटीस दिली होती. अरुणकुमार शर्मा आज न्यायालयात हजर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अरुणकुमार शर्मा यांना कायदेशीर नोटीस दिल्यानंतर ते व आरोपी मला भेटण्यासाठी आले होते. आरोपी व अरुणकुमार शर्मा एकत्रीतरित्या काम करतात याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अरुणकुमार शर्मा हे मला रक्कम देऊ लागत होते आणि त्याबदली वादातील धनादेश अरुणकुमार शर्मा यांनी दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या धनादेशाचा गैरवापर करुन ही खोटी केस दाखल केली आहे. वादातील धनादेश हा अकाऊंट पेयी होता. हे म्हणणे खरे नाही की, वादातील धनादेश आरोपीने मला तो कायदेशीर देय असलेल्या रकमेपोटी दिला होता हे मी खोटे सांगत आहे. मी माझे स्वतःचे आयकर विवरणपत्र भरत नाही परंतु मी माझ्या फर्म करीता आयकर विवरणपत्र भरतो. सारा एजन्सी नांवे कॅनरा बँक शाखा सावंतवाडी येथे खाते आहे. वादातील धनादेश सारा एजन्सी करीता आला होता आणि माझ्या वैयक्तीक करीता आला नव्हता. दि.२३/१२/२०१९ रोजीची नोटीस मी सारा एजन्सी करीता दिलेली नसुन मी माझ्या व्यक्तीगत दिलेली आहे. ही फिर्याद मी व्यक्तीगत दाखल केलेली आहे. आरोपीने माझ्याकडून व्यक्तीगतपणे जेसीबीद्वारे काम करुन घेतलेले आहे आणि सारा एजन्सी करीता केलेले नाही. मी जे आयकर विवरण पत्र भरलेले आहे त्यामध्ये सारा एजन्सी करीता रक्कम रु.६६,०००/– येणे बाकी आहे असे नमुद केलेले नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत.

RUPALI RAJANIKANT BEDAGKAR

Digitally signed by RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Date: 2022.10.19 19:01:34 +0530

दिनांकः– १९/१०/२०२२

(श्रीमती आर. आर. बेडगकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.